श्री सिध्दिविनायक

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)
एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२
ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org
वेबसाईट : www.siddhivinayak.org

## द्वितीय मुदतवाढ

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात प्लंबिग साहित्य पुरवठा करण्याबाबत.**
**१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२६**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात प्लंबिग साहित्य पुरवठा करण्याकरीता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून विहित पध्दतीने वर्षभरासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आली होती त्यात एकाच दरपत्रकधारकाने सहभाग घेतला असल्यामुळे द्वितीय मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : सोमवार, दि.०२.०३.२०२६ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : बुधवार, दि.०१.०४.२०२६,सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : शुक्रवार, दि.०३.०४.२०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification)प्लंबिग साहित्य खरेदी करून देण्याबाबत मोहरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

२) पुरवठा करीत असलेल्या प्लबिंग साहित्याचा दर्जा उत्तम असावा.

३) दरपत्रकधारकाने २ वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे सादर करावी. तसेच दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून किमान २५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) सदर प्लंबिग साहित्याचा पुरवठा करून देण्याबाबत कार्यादेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाची जबाबदारी आपली राहील. साहित्यांच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही तसेच मालाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

५) पुरवठादाराने काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बँकेचा तपशील नमूद करणे आवश्यक आहे.

६) सदर दरपत्रकधारक हा हिंदु असावा.

७) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) प्लंबिग साहित्याचा पुरवठा करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असल्याचे दर्शविणारी कागदपत्रे. (कार्यादेश, पुरवठा आदेश, बिलाच्या प्रती यापैकी एक )

८) दरपत्रक भरतांना कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

९) नियमानुसार आवश्यक कर कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

११) कोणतीही कारणे न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१२) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१३) प्लंबिग साहित्या संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१४) दरपत्रकधारकाने A ४ साईज लिफाफा मध्ये तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

१५) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

Vpatil

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी